# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

## परीक्षा विभाग

## वार्षिक अहवाल : २०१९-२०२०

१) **उद्‌बोधन वर्ग:-** महाविद्यालयातील बी. ए., बी. कॉम. व बी. एस्सी. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी दि. २८/०८/२०१९ रोजी उद्‌बोधन वर्ग घेण्यात आला. याप्रसंगी परीक्षा विभागाच्या वतीने शैक्षणिक सत्राचे वेळापत्रक व परीक्षांच्या अंदाजे कालावधी याविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. याबरोबरच कॉपीमुक्त परीक्षा महाविद्यालयात घेतल्या जातात. अभ्यास करुन विद्यार्थ्यांनी परीक्षेला सामोरे जावे असे अवाहन करण्यात आले.

२) **विद्यापीठ परीक्षा ऑक्टो/नोव्हें २०१९:-** बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या ऑक्टो/नोव्हें २०१९ या सत्र परीक्षा दि. १०/१०/२०१९ ते ३१/१०/२०१९ या कालावधीत संपन्न झाल्या. तसेच एम. कॉम प्रथम वर्षाच्या परीक्षा दि. १९/११/२०१९ ते दि. २२/११/२०१९ या कालावधीत संपन्न झाल्या.

३) **वर्गचाचणी परीक्षा:-** महाविद्यालयात अंतर्गत मुल्यमापन करण्यासंबंधी चर्चा दि. ०८/०१/२०२० रोजी IQAC मिटींग मध्ये झाली. त्यानुसार वर्गचाचणी वेळापत्रक दि. १३/०१/२०२० रोजी फलकावर लावण्यात आले. त्यानुसार बी. एम. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाची वर्गचाचणी परीक्षा दि. ०३/०२/२०२० रोजी घेतली. बी. एस्सी. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाची वर्गचाचणी परीक्षा दि. ०४/०२/२०२० घेतली. तसेच बी. कॉम प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाची वर्गचाचणी परीक्षा दि. ०५/०२/२०२० रोजी घेण्यात आली. वर्गचाचणीच्या उत्तरपत्रिका दि. ०७ व ०८ फेब्रुवारी २०२० रोजी संबंधित विषय शिक्षकाकडे सुपूर्द केल्या.

४) **परीक्षाचे निकाल काढले:-** मागील वर्षातील ऑक्टो/नोव्हें २०१८ व मार्च/एप्रिल २०१९ या परीक्षांचे निकाल दि. ०२ डिसेंबर २०१९ व दि. ०३ डिसेंबर २०१९ रोजी काढले.

विद्याशाखानिहाय निकाल खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | वर्ग | ऑक्टो २०१८ | मार्च २०१९ |
|---|---|---|---|
| १ | बी. ए. प्रथम वर्ष | ९.६२% | १८.२९% |
| २ | बी. ए. द्वितीय वर्ष | ५७.१४% | २३.३३% |
| ३ | बी. ए. तृतीय वर्ष | २५.९२% | २६.९२% |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | बी. कॉम. प्रथम वर्ष | २२.२२% | ४.९१% |
| ५ | बी. कॉम द्वितीय वर्ष | ५३.३३% | ४४.२३% |
| ६ | बी. कॉम तृतीय वर्ष | ४१.३४% | ४७.८२% |
| ७ | बी. एस्सी प्रथम | १७.६४% | २९.५२% |
| ८ | बी. एस्सी द्वितीय | ४९.३५% | १८.१८% |

५) **पदवी प्रमाणपत्रे प्राप्त केली:-** मागील शैक्षणिक वर्षातील बी. ए. व बी. कॉम तृतीय वर्षाच्या ऑक्टो/नोव्हें २०१६ व मार्च/एप्रिल २०१९ परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांची पदवी प्रमाणपत्रे दि. ०६ मार्च २०२० रोजी विद्यापीठातून आणले.

६) **मार्च/एप्रिल २०२० परीक्षेची तयारी:-** विद्यापीठ परीक्षा मार्च/एप्रिल २०२० या दि. १७ मार्च ते दि. ११ एप्रिल या कालावधीत महाविद्यालयात होत आहेत. दि. १३/०३/२०२० रोजी संगणक व पर्यावरण या विषयाच्या परीक्षेचे वेळापत्रक फलकावर लावण्यात आले. पुढील परीक्षा सुरळीत संपन्न होण्याच्या दृष्टीने तयारी करण्यात येत आहे.